जिल्हा उद्योग केंद्र,नांदेड.

महाराष्ट्र शासन

# कार्यालय महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड.

उद्योग भवन, पहिला मजला, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड- 431602

(02462) (250056) Email: didic.nanded@maharashtra.gov.in

जा.क्र.जिउकेनां/निप्रसबै/2023/336

दिनांक : 21/03/2023

## महाराष्ट्र निर्यात प्रचालन परिषद अंतर्गत जिल्हा निर्यात प्रचालन समिती बैठक दि. 28.02.2023 इतिवृत्त

महाराष्ट्र निर्यात प्रचालन परिषदेतंर्गत जिल्हा निर्यात प्रचालन समिती बैठक दि. 28.02.2023 रोजी सायं. 4.00 वा. मा.जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे संपन्न झाली. सभेस सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते. सभेत खालील विषयावर चर्चा करण्यात आली.

❖ नांदेड जिल्हयात धर्माबाद परिसरात मिरचीचे उत्पादन मोठया प्रमाणात होते. धर्माबाद येथील मिरचीला भौगोलिक स्थान असून रंग, चव व दर्जा उत्तम असून दैनंदिन वापरामध्ये मिरचीचा उपयोग होत असल्यामुळे बाजारामध्ये मिरचीला मोठया प्रमाणात मागणी आहे. एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) अंतर्गत धर्माबाद तालूक्यामध्ये व परिसरात चिली क्लस्टर स्थापित करणेबाबत मा. अध्यक्षांनी सांगितले. तसेच अर्धापूर तालूक्यात केळीचे उत्पादन मोठया प्रमाणावर होते, केळीवर आधारीत उत्पादित वस्तूसाठीही क्लस्टर स्थापित करणेबाबत सांगण्यात आले.

❖ नांदेड जिल्हयात भौगोलिकदृष्टया बहुतांश भाग जंगलाने व्याप्त असलेल्या किनवट तालूक्यात सागवान लाकूड व बांबूवर आधारीत वस्तू तयार करण्याचे तसेच लोहा तालूक्यातील माळाकोळी येथील मुर्तीकार मुर्ती बनवतात, बांबू वस्तू व मुर्ती बनविण्याचे क्लस्टरची स्थापना करणेबाबत प्रयत्न सुरु असल्याचे सांगण्यात आले.

❖ नांदेड जिल्हयातील माता रेणूकीदेवी तीर्थक्षेत्र असलेल्या माहूर येथे तांबूल विक्री होते. तरी केळीवर आधारीत उत्पादित खाद्यवस्तू व तांबूल यास भौगोलिक मानांकन (G.I. Tag) चिन्ह प्राप्तीकरीता चर्चा करण्यात आली. लोहा तालूक्यात मोठया प्रमाणात गोडंबी फोडण्यात येते. एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) या धर्तीवर जिल्हयात एक तालूका एक उत्पादनाची निवड करण्यात यावी असेही मा. अध्यक्षांनी सांगितले.

2 ...

Scanned with OKEN Scanner

❖ सोयाबीन आधारीत खाद्यवस्तू उत्पादन निर्यातीसाठी बैठक घेण्याचे मा. अध्यक्षांनी सांगितले. वरील सर्व उत्पादन निर्यातीकरिता उत्पादन निर्यात व त्याचा दर्जा वाढविण्याचे प्रयत्न होणे आवश्यक असल्याचेही सांगण्यात आले. जिल्हयातील तांत्रिक व व्यवस्थापन संस्था यांचा समावेश जिल्हा निर्यात प्रचालन समिती बैठकीमध्ये होणेबाबत महाव्यवस्थापक यांनी सांगितले. जेणेकरुन उत्पादित वस्तूंच्या Designing, Branding & Marketing याकामी सामंजस्य करार करणे शक्य होईल. जिल्हयातील तांत्रिक व व्यवस्थापन संस्थामधील विद्यार्थ्यांना उत्पादित वस्तूंच्या Designing, Branding & Marketing करिता Assignment देण्यात यावे असे मा. अध्यक्षांनी निर्देश दिले. व्हीडीओ कॉन्फरसिंगद्वारा निर्यातदारांची बैठक तसेच निर्यात प्रक्रियेबाबत कार्यशाळा घेवून तज्ञामार्फत मार्गदर्शन घेण्यात यावे असेही मा. अध्यक्षांनी सांगितले.

अशाप्रकारे उपरोक्तप्रमाणे नांदेड जिल्हयातील निर्यातवाढीकरिता आवश्यक चर्चा करण्यात आली. निर्यातवाढीकरिता सर्वांनी प्रयत्न करावेत व संबंधीत यंत्रणांचा सहभाग व समन्वय करुन काम करावे असे निर्देश मा. अध्यक्षांनी दिले. शेवटी महाव्यवस्थापकांनी उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

महाव्यवस्थापक जिल्हा उदयोग केंद्र, नांदेड तथा
सदस्य सचिव,जिल्हा निर्यात प्रचालन समिती नांदेड.

मा. जिल्हाधिकारी, नांदेड
तथा अध्यक्ष जिल्हा निर्यात प्रचालन समिती नांदेड.

Scanned with OKEN Scanner